**कलम 4 (1) (b) (Xi)**

**शिंदखेडा येथील पंचायत समिती कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती.**
**(समाजकल्याण विभाग)**

**कार्यक्रमाचे नाव:- जि.प.*20* टक्के निधीतून *100* टक्के अनुदानाने ग्रामीण भागातील मागासवर्गी*यांना* स्वयंरोजगारासाठी *100* टक्के अनुदानाने मिनी पिठ गिरणी पुरविणे.**

**1) लाभार्थी पात्रतेसंबंधी अटी व शर्ती:-** 1) लाभार्थी ग्रामीण भागातील अनु.जाती/ जमाती किंवा वि.जा.भ.ज. नवबौध्द पैकीच असावा. व तसा सक्षम अधिका-याने जातीचा दाखला दिलेला असावा. 2) दारिद्रय रेषेचे कार्ड धारक किवा रु.60000 च्याआंत वार्षिक उत्पन्नाचा दाखला दिलेला असावा. तसा सक्षम अधिका-याने जातीचा दाखला दिलेला असावा. 3) ग्रामसभेत निवड झालेली असावी तसा ग्रामसभेचा ठराव असावा. 4) यापूर्वी या योजनेचा शासनाकडून लाभ घेतलेला नसावा. 5) लाभार्थ्याचे वय 18 पेक्षा कमीचे नसावे. 6) लाभार्थी शासकीय/निमशासकीय सेवेत नसावा. ग्रामसभा ठराव, यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नाही असा ग्रामसेवक यांचा दाखला, नमुना अर्ज व पासपोर्ट फोटो इत्यादी आवश्यक.

**2) लाभ मिळण्यासाठीच्या अटी:-** वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकरी यांच्या मार्फत पंचायत समिती स्तरावर सादर करणे.

**3) लाभ मिळण्यासाठीची कार्यपध्दती:-** विहीत नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी यांचे कडून पंचायत समिती स्तरावर जमा करण्यात येतो. त्यानंतर प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव पं स. सभेच्या मान्यतेने मंजूर करण्यात येतो.

**4) पात्रता ठरविण्यासाठीच्या आवश्यक कागदपत्र:-** अ.क्र.2 मधील अटी शर्तीप्रमाणे सर्व कागदपत्र आवश्यक आहेत.

**5) कार्यक्रमामध्ये मिळणा-या लाभाची विस्तृत माहिती :-** सदर योजना 100 टक्के अनुदानाची आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्याने मिनी पिठ गिरणी खरेदीचे देयक पं. स. स्तरावर सादर करावे.

**6) अनुदान वाटपाची कार्यपध्दती:-** 1) लाभार्थ्याने मिनी पिठ गिरणी खरेदीचे बिल पं. स. स्तरावर सादर केल्यानंतर सदर देयकाची छाननी करण्यात येईल. 2) देयक मंजूर झाल्यानंतर अनुदान थेट लाभार्थ्याच्या बचत खाती जमा करण्यात येईल.

**7) सक्षम अधिका-याचे पदनाम:-** मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा

**8) विनंती अर्जासोबत लागणारे शुल्क :-** विनामुल्य

**9) इतर शुल्क** :- विनामुल्य

**10) विनंती अर्जाचा नमूना:-** जि.प. / पं. स. ने दिलेला विहीत नमुना अर्ज

**11) सोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्राची यादी:-** अ.क्र.2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे.

**12) जोड कागदपत्रांचा नमूना:-** शासनाने विहीत केलेल्या नमुन्यातवा निर्दिष्ठ यादी प्रमाणे दाखले.

**13) कार्यपध्दती संदर्भात तक्रार निवारण अधिकारी पदनाम:-** म.समाज कल्याण अधिकारी जि.प.धुळे.

**14) तपशीलवार व प्रत्येक स्तरावर उपलब्ध निधी:-** जिल्हा स्तरावरून पंचायत समिती पातळीवर निधी उपलब्ध होत असतो.

**15)** लाभार्थीची यादी पुढील पानावर नमुन्यात देण्यात आली आहे.

कलम 4 (1) (b) (Xi)

**शिंदखेडा येथील पंचायत समिती कार्यालयातील अनुदान कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची विस्तृत माहिती प्रकाशित करणे**

**योजना/कार्यक्रमाचे *नांव* :मिनी मिठ गिरणी** खरेदी

लाभार्थी यादी (समाज कल्याण विभाग)

| **अ.क्र.** | **लाभार्थीचे नांव व पत्ता** | **अनुदान/लाभ यांची रक्कम/स्वरुप** | **निवड पात्रतेचे निकष** | **अभिप्राय** |
|---|---|---|---|---|
| 1 | - | पंचायत समिती स्तरावर यादी उपलब्ध आहे. | - | |
| | | | | |